कोकणसाद
www.kokansad.com
सोमवार, दि. ९ जानेवारी २०२३

# वर्तमानातील आव्हानांना सामोरे जाणाऱ्यांचे भविष्य समृद्ध

- माजी केंद्रप्रमुख गजानन वाडकर यांचे प्रतिपादन
- हळबे महाविद्यालय एन.एस.एस. विभागाच्या निवासी शिबिराचा शिरंगेत समारोप

**दोडामार्ग :** समग्र मानवापुढे अलीकडील काळात अनेक संकटे उभी आहेत. त्यांना न डगमगता धैर्याने तोंड देण्याचे मनोधैर्य तरुणांमध्ये निर्माण झाले पाहिजे. भूतकाळात रमलेला आजचा विद्यार्थी भविष्याच्या सुखासाठी आपला वर्तमान-काळ जगायचंच विसरत चालला आहे. जे वर्तमानातील आव्हानांना समर्थपणे सामोरे जातील, तेच विद्यार्थी भविष्यात समृद्ध बनतील, असे मनोगत माजी केंद्रप्रमुख व घोडगेवाडी ग्रामपंचायत सदस्य गजानन वाडकर यांनी व्यक्त केले.

ते लक्ष्मीबाई सीताराम हळबे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय दोडामार्ग, राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या शिरंगे येथे झालेल्या ७ दिवसीय निवासी शिबिराच्या समारोप प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष सावंत होते. यावेळी व्यासपीठावर शिरंगे येथील सरपंच सरस्वती नाईक, तेथील प्रशालेचे मुख्याध्यापक प्रशांत नाईक, सह.शिक्षक कैलास पालवे, अशोक भोसले, शिरंगे पोलीस पाटील प्रकाश देसाई, ग्रामपंचायत सदस्य सीता गवस, वैशाली घाडी, शाळा समितीच्या अध्यक्षा सुहानी गवस, आशा सेविका तन्वी गवस, कार्यक्रम अधिकारी दिलीप बर्वे, डॉ. राजेंद्र इंगळे, डॉ. सोपान जाधव, ग्रामपंचायत कर्मचारी मधुकर गवस उपस्थित होते.

शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये श्रम, प्रतिष्ठा, शिस्त, स्वच्छता, आरोग्य, पर्यावरण संवर्धनाची जाणीव, राष्ट्रीय एकात्मता, समता, सहकार्याची भावना व सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण करणे हे शिबिराचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, मतदान एक राष्ट्रीय कार्तव्य, व्यावसायिक संधी, आरोग्य इत्यादी विषयावरील विविध तज्ज्ञाच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आल्याचा तसेच सात दिवसात केलेल्या सार्वजनिक कामांची माहिती कार्यक्रम अधिकारी प्रा. दिलीप बर्वे यांनी आपल्या अहवाल वाचनातून दिली. यावेळी साक्षी गवस, महिमा गवस या विद्यार्थ्यांनी यांनी आपले अनुभव सांगितले. शिबिराचे उद्घाटन माजी पंचायत समिती सदस्य व सामाजिक कार्यकर्ते बाबुराव धुरी व पत्रकार संदीप देसाई यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

प्राचार्य डॉ. सुभाष सावंत यांनी कॅम्पसाठी सहकार्य करणाऱ्या सर्व ग्रामस्थांचे आभार मानले. यावेळी ग्रामस्थ, महिला बचत गटाच्या महिला, माजी विद्यार्थी, शिक्षक उपस्थित होते. सूत्रसंचालन महिमा गवस हिने केले. डॉ. राजेंद्र इंगळे यांनी आभार मानले.



एनएसएस शिबिराच्या समारोपप्रसंगी बोलताना गजानन वाडकर. सोबत मान्यवर.



शिरंगे येथे झालेल्या हळबे महाविद्यालयाच्या एनएसएस शिबिराचे उद्घाटन करताना माजी पंचायत समिती सदस्य बाबुराव धुरी. सोबत प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेले कोकणसाद लाईव्हचे ब्युरो चीफ संदीप देसाई, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष सावंत व मान्यवर.